पनवेल(प्रतिनिधी) सिडको क्षेत्र असलेल्या ठिकाणी शासनाचे उपकेंद्र उभारण्यासाठी सिडको तसेच तहसिल कार्यालयाकडे यापूर्वीच मागणी केली असून शासनाच्या सर्व सेवा खारघरला देण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथे आज केले.

खारघरमधील नागरिकांची व विद्यार्थ्यांची सरकारी दाखले मिळविण्याकरिता होणारी धावपळ आणि त्रास लक्षात घेवून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि महसूल विभाग पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर येथे दाखले वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.०७) झाले.त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

खारघर येथील सेक्टर १२ मधील गोखले हायस्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिबीरास प्रमुख पाहुणे म्हणून पनवेलचे नायब तहसीलदार व सुप्रसिध्द शरिर सौष्ठवपटू सुहास खामकर, पनवेल शहर कॉंग्रेसचे प्रवक्ते व खारघर प्रभारी वाय.टी.देशमुख, मंडळ अधिकारी एस.एम.पाटील, खारघर शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष अनंता तोडेकर, कार्याध्यक्ष सुनिल सावर्डेकर, तालुका चिटणीस रामदास नारकर, नरेश तोडेकर, महिला शहर अध्यक्षा कुंदा मेंगडे, रूपाली जैन, ओवे ग्रामपंचायतीचे उपसरपंच साजिद पटेल, सदस्य सचिन वास्कर, जसविंदरसिंग सैनी, प्रमोद म्हात्रे, नानासाहेब पाटील, नरेश तोडेकर, श्री.कारंडे, ॲड.जे.पी.खारगे, आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयांचे मुख्य समन्वयक अविनाश कोळी, किर्ती नवघरे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, परिक्षांचा निकाल लागल्यानंतर पुढील वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांची आवश्यकता असते त्याकरिता त्यांना व त्यांच्या पालकांना धावपळ करावी लागते. या शिबीराच्या माध्यमातून त्यांची पायपीट थांबणार आहे तसेच वेळेचेही बचत होणार आहे. येथील शिबीराच्या आयोजनासाठी तहसिलदार पवन चांडक, नायब तहसिलदार सुहास खामकर तसेच गोखले हायस्कूलने दिलेले योगदान महत्वपूर्ण असल्याचे सांगून आ.ठाकूर यांनी आपल्या भाषणातून त्यांचे आभारही व्यक्त केले. शासनाने मतदार नोंदणीचा कार्यक्रम पुन्हा हाती घेतला असून मतदार नोंदणी किंवा दुरूस्तीसाठी नागरिकांनी दक्ष राहून या प्रकियेत सकीयतेने सहभाग घ्यावा, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी उपस्थितांना केले.

यावेळी नायब तहसिलदार सुहास खामकर यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, खारघरमधील विद्यार्थी व नागरिकांची गेरसौय होवू नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने आज या शिबीराचे आयोजन करण्यात आले असून या शिबीराच्या माध्यमातून अर्जदारांना उत्पन्न, अधिवास, नॉन क्रिमिलेयर, जातीचा दाखला तसेच ज्येष्ठ नागरिक कार्ड आदी शासकीय दाखले उपलब्ध होणार आहेत.

खारघरमधील विद्यार्थ्यांना शासकीय दाखले तसेच ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्रासाठी पनवेलला जावे लागू नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या शिबीराचे आयोजन करून अर्जदारांच्या वेळेची व पैशाची बचत आणि धावळीचा त्रास कमी केला आहे. दाखल्यांसंदर्भात संपूर्ण माहिती येथे दिली जात असून हा उपकम अत्यंत कौतुकास्पद आणि महत्वपूर्ण आहे, असे मत सुनिल सावर्डेकर यांनी यावेळी व्यक्त केले.